पुण्य नगरी

# प्राथमिक आरोग्यसेवेसाठी क्विक हीलचे आरोग्ययान

**पुणे** : क्विक हीलने आपल्या क्विक हील फाऊंडेशन या सीएसआर उपक्रमाच्या माध्यमातून राजस्थानातील सिरोही येथील वंचित व आदिवासी समुदायांसाठी आरोग्ययान ही अत्याधुनिक वैद्यकीय व्हॅन देणगी स्वरूपात दिली आहे. ही व्हॅन विनोद पारसरामपुरीया सेवा फाऊंडेशनच्या सहयोगाने, सिरोही, स्वरूपहंज, नितोडा, रोहिडा व भुला येथील ३ लाखांहून अधिक लाभार्थींना उत्तम आरोग्याची भेट देणार आहे. यात या भागातील दारिद्र्यरेषेखालील ७१३८ कुटुंबांचा समावेश आहे. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि सेवा भारती-जोधपूर प्रांताचे संघटन मंत्री स्वरूप दान यांच्या उपस्थितीत आरोग्ययान सुपूर्द करण्याचा सोहळा पार पडला.

Mumbai Edition

Jan 24, 2023 Page No. 08